बातमीपत्र

**पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर**

**माहिती कक्ष, दि १४ ऑक्टोबर २०२५**

# जोडभावी पेठ पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ६९४/२०२५ भा. न्याय संहिता कलम १०३(१) प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. १४/१०/२०२५ रोजी सकाळी ०८.०० वा चे सुमारास, घर नं. ०५ चे शेजारी पत्र्याचे घर, रमाबाई आंबेडकर नगर, न्यु बुधवार पेठ, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १४/१०/२०२५ रोजी १२.२८ वा |
| **फिर्यादीचे नाव** | : | श्रीमती अन्नपुर्णा निलकंठ बाळशंकर, वय- ५० वर्षे, रा. घर नं. ०५, रमाबाई आंबेडकर नगर, न्यु बुधवार पेठ, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | सुहास तुकाराम सिध्दगणेश, वय- ४३ वर्षे, तळेहिप्परगा, सोलापूर |
| **मयताचे नाव** | : | यशोदा सुहास सिध्दगणेश, वय- ३५ वर्षे, रा. घर नं. ०५ चे शेजारी पत्र्याचे घर, रमाबाई आंबेडकर नगर, न्यु बुधवार पेठ, सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी या नेहमी प्रमाणे कामावर जाण्यासाठी तयार होऊन निघत असताना यातील मयत यशोदा हिच्या घरातुन जोरात ओरडण्याचा आवाज ऐकु आला. त्योवळी फिर्यादी तिच्या घराजवळ येवून आत डोकावुन पाहिले असता, यशोदा या लोखंडी बेड जवळ जमीनीवर खाली पडलेली होती व यातील आरोपीत सुहास हा त्याच्या हातातील चाकुने यशोदा हिच्या पोटात व गळयावर वार करुन चाकु कुपसत होता. तेव्हा फिर्यादी यांनी आरडा ओरडा करुन यशोदा हिच्या जवळ आत जात असताना यातील आरोपीत सुहास म्हणाला की आमच्या मध्ये कोणी आला तर, मी सर्वांना खल्लास करुन टाकीन, अशी धमकी देवून हातामध्ये चाकु घेवून घरातुन निघुन गेला. त्यावेळी फिर्यादी यांनी आरडा ओरडा करुन आजु बाजुच्या लोकांना गोळा केले. त्यावेळी यशोधा हिच्या घरामध्ये करीष्मा गजधाने ही आली. त्यावेळी यशोदा ही रक्ताच्या थारोळयात निपचीत पडल्याचे पाहुन करिष्मा गजधाने यांनी शालीनी कटारमल हिस सुहास याने यशोदा हिला चाकुने मारले आहे. तिला हॉस्पीटलमध्ये घेवून जाण्यासाठी रिक्षा घेवून ये असे फोन करुन सांगितले. त्यावेळी तुषार कटारमल, शालीनी कटारमल व रिक्षा चालक गोटु बनसोडे असे सर्वजण तेथे आले त्यावेळी सर्वांनी यशोदा हिस रिक्षामध्ये घालुन सिव्हील हॉस्पीटल येथे घेवून गेले असता, सिव्हील हॉस्पीटल येथील डॉक्टरांनी यशोदा हिस तपासुन ती मयत झाली असल्याचे सांगितले. तरी वरील आरोपीताने यशोदा हिला चारित्र्यावर संशय घेवून तिच्या गळयावर व पोटावर चाकुने गंभीर वार करुन जखमी करुन जिवे ठार मारले आहे म्हणून. तपास:- सपोनि- गायकवाड- ९९७००३३५४० |

# जोडभावी पेठ पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ६९५/२०२५ भा. न्याय संहिता कलम ३०३(२) प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. १०/१०/२०२५ रोजी २०.३० वा ते दि. ११/१०/२०२५ रोजी सकाळी ०९.३० वा चे दरम्यान, ऐश्वर्या ८७/बी, भवानी पेठ, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १४/१०/२०२५ रोजी १६.०४ वा |
| **फिर्यादीचे नाव** | : | विश्वनाथ रुद्रय्या कलमठ, वय- ६३ वर्षे, रा. प्लॉट नं. १, सिल्व्हर इनक्लेव्ह, टाटा नगर, कोडगेहळ्ळी, बेंगलोर, कर्नाटक, सध्या- रा. ऐश्वर्या ८७/बी, भवानी पेठ, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | अज्ञात चोरटा |
| **गेला माल** | : | ८०,०००/- रु एक निळया रंगाची मारुती सुझुकी कंपनीची अल्टो कार |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादीची वरील वर्णनाची व किंमतीची अल्टो कार क्रं. के ए ०८ एम ई ३४६२ ही वरील ठिकाणी फिर्यादीचे घरासमोर लावली होती. दि. ११/१०/२०२५ रोजी सकाळी ०९.३० वा चे सुमारास, दवाखान्यात जाणेकरीता फिर्यादी घराबाहेर येवून कार लावलेल्या ठिकाणी आले असता तेथे फिर्यादीची कार दिसुन आली नाही, तरी कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीची वरील वर्णनाची कार फिर्यादीच्या संमतीवाचून, मुद्दाम लबाडीने चोरुन नेली आहे म्हणून. तपास:- पोहेकॉ/ २७५ रुपनर- ८७८८२८४४७४ |